**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक ५६ वा ● शुक्रवार १२ जुलै २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 56 | Date : 12/07/2024 blow Friday Page 4 Price 4



## हरी नामाच्या गजरात.. संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे सोलापूर जिल्ह्यात आगमन

### धर्मपुरी येथे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले पालखीचे स्वागत

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः आषाढी वारी सोहळ्यात विठ्ठलाच्या दर्शनाची आस घेऊन आळंदी येथून निघालेल्या संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्र्वर माऊलींच्या पालखीचे आज सोलापूर जिल्ह्यातील धर्मपुरी येथे आगमन झाले. पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी पालखीचे स्वागत करून माऊलीच्या पादुकांचे मनोभावे दर्शन घेतले.



धर्मपुरी येथे पालखी स्वागतासाठी पालकमंत्री श्री. पाटील यांच्यासह खासदार धैर्यशील मोहिते, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे, अतिरिक्त जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकुर, माजी आमदार रामहरी रुपनवर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, अकलूजचे प्र. उपविभागीय अधिकारी अमित माळी यांच्यासह प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. माऊलीच्या पालखी स्वागतापूर्वी पालखी सोहळ्यातील अश्र्वाचे पूजन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

✻पालकमंत्र्यांनी केले सारथ्यः धर्मपुरी येथे पालखी स्वागतानंतर पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी माऊलीच्या रथाचे सारथ्य केले. रथामध्ये त्यांच्या समवेत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद उपस्थित होते. पालखी स्वागतानंतर प्रशासनातील अधिकारी व लोकप्रतिनिधींनी । पान २ वर

## माजी अग्निविरांसाठी आनंदाची बातमी; सशस्त्र दलात १० टक्के पदे राखीव

### केंद्रीय गृहमंत्र्यालयाची मोठी घोषणा!

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नवी दिल्ली : अग्निवीर योजना जाहीर केल्यापासून ही योजना वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. विरोधकांकडून सातत्याने या योजनेवर टीका केली जात आहे. याचे पडसाद लोकसभेत देखील बघायला मिळाले आहेत. दरम्यान, आता केंद्रीय गृहमंत्रालयाने माजी अग्निवीर जवानांसाठी मोठी घोषणा केली आहे. माजी अग्निवीर जवानांसाठी केंद्रीय सशस्त्र दलात १० टक्के पदे राखीव ठेवली जातील असं केंद्रीय गृहमंत्रालयाने जाहीर केलं आहे.

केंद्रीय गृहमंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार आता सीआयएसएफ, बीएसएफ, सीआरपीएफ आणि आरपीएफ सारख्या सशस्त्र दलात माजी अग्निवीर जवानांसाठी १० टक्के जागा राखीव ठेवण्यात येणार आहेत. तसेच त्यांना शारीरिक चाचणीतदेखील शिथीलता देण्यात येणार असल्याची माहिती आहे. याशिवाय त्यांना वयोमर्यादेतसुद्धा सूट मिळणार आहे. पहिल्या तुकडीसाठी पाच वर्ष तर पुढच्या तुकड्यांसाठी तीन वर्षांची सुट मिळणार असल्याचे सांगितले जाते आहे. यासंदर्भात बोलताना, सीआरपीएफचे महासंचालक अनिश दयाल म्हणाले, सीआरपीएफमध्ये माजी अग्निवीरांच्या भरती प्रकिक्रयेसंदर्भातील सर्व व्यवस्था झाली आहे. माजी अग्निवीरांच्या पहिल्या तुकडीला वयोमर्यादेत ५ वर्षांची सूट दिली जाणार आहे. तसेच त्यांनी शारीरिक चाचणीतदेखील सूट दिली जाणार आहे. याशिवाय सीआयएसएफनेही यासंदर्भात सर्व तयारी केली असल्याची माहिती सीआयएसएफच्या महासंचालक नीना सिंह यांनी दिली आहे.

यासंदर्भात बीएसएफचे महासंचालक नितीन अग्रवाल यांनीदेखील । पान २ वर

## मणिपूर मुद्द्यावर सरकारवर दबाव आणू; राहुल गांधी यांचे आश्वासन

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नवी दिल्ली : काँग्रेस पक्ष आणि इंडिया आघाडी संसदेत पूर्ण ताकदीनिशी मणिपूरमध्ये शांततेची गरज मांडून ही शोकांतिका संपवण्यासाठी सरकारवर दबाव आणेल, असे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मणिपूर भेटीनंतर गुरुवारी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मणिपूरचा दौरा करून जनतेच्या समस्या ऐकून घ्याव्यात आणि शांततेचे आवाहन करावे, असा पुनरुच्चारही त्यांनी केला.



''तिथे हिंसाचार सुरू झाल्यापासून मी मणिपूरला तीन वेळा भेट दिली आहे, परंतु दुर्दैवाने परिस्थितीत कोणतीही सुधारणा झालेली नाही. आजही राज्य दोन भागात विभागले गेले आहे. घरे जळत आहेत, निष्पापांचे जीव धोक्यात आले आहेत । पान २ वर

## आषाढी पालखी सोहळ्यातील तीन दिड्यांना श्री. विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार

### सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांची माहिती

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरीची पायीवारी ही महाराष्ट्राची प्राचीन, अध्यात्मिक व सांस्कृतिक परंपरा आहे. या पायीवारी सोहळ्याची परंपरा अखंड राहण्यासाठी या परंपरेचे रक्षण व संवर्धन करणे हे आपल्या सर्व वारकरी वैष्णवांचे सर्व प्रथम कर्तव्य आहे. हा पायीवारी सोहळा स्वच्छ, निरोगी व निरामय राखण्यासाठी या सोहळ्यातून समाजाला सामाजिक, पर्यावरण, वृक्ष संवर्धन, प्लॅस्टिक मुक्ती, व्यसनमुक्ती, स्त्रीभ्रूण हत्या यासारखे सामाजिक विषयांचे प्रबोधन होणे गरजेचे आहे.

आषाढी यात्रेतील सर्व सोहळ्यातील बऱ्याच दिंड्या हे कार्य करत आहेत, त्यांच्या कार्याचा उचित असा सन्मान व्हावा. त्याच प्रमाणे इतर दिंड्यानीही त्याचा आदर्श घेवून या निर्मल वारी, हरीत वारी अभियान मध्ये सहभाग घ्यावा. । पान २ वर

## भारतानं जगाला बुद्ध दिला, युद्ध नव्हे, पंतप्रधान मोदींचा व्हिएन्नातील भारतीयांशी संवाद

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या ऑस्ट्रियाच्या दौऱ्यावर आहेत. याआधी त्यांनी रशिया दौऱ्यादरम्यान व्लादीमीर पुतिन आणि इतर उच्चपदस्थांशी चर्चा केली. या भेटीदरम्यान दोन्ही देशांमधील संबंध वृद्धिंगत करण्यासंदर्भात सहमती झाल्याचंही दिसून आलं. त्यानंतर सध्या पंतप्रधान नरेंद्र मोदी व्हिएन्नामध्ये असून तिथल्या भारतीयांशी त्यांनी बुधवारी संवाद साधला. यावेळी भारतानं जगाला युद्ध नव्हे, तर बुद्ध दिला, असं मोदी म्हणाले.



भारत आता जागतिक नेतृत्वासाठी इच्छुक असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यावेळी म्हणाले. भारत सध्या सर्वोत्तम होण्याचा, सर्वाधिक यश मिळवण्याचा आणि सर्वोच्च यश गाठण्याचा प्रयत्न करत आहे, असं मोदींनी यावेळी नमूद केलं. गेल्या हजारो वर्षांपासून भारतानं आपलं ज्ञान आणि कौशल्य जगभरात इतरांना दिलं आहे. आपण जगाला युद्ध दिलेलं नाही, तर बुद्ध दिला आहे. भारतानं नेहमीच जगाला शांतता आणि समृद्धी दिली. त्यामुळे २१व्या शतकात भारत जागतिक पटलावर महत्त्वाची भूमिका बजावणार आहे, असा विश्र्वास यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी व्हिएन्नामधील भारतीयांसमोर व्यक्त केला.

माजी पंतप्रधान इंदिरा गांधींनंतर ऑस्ट्रियाच्या दौऱ्यावर जाणारे नरेंद्र मोदी पहिलेच पंतप्रधान ठरले आहेत. हा भारताच्या । पान २ वर

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे संविधान मजबुत करणारे नेते : केंद्रीय राज्यमंत्री आठवले

### केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी साधला विद्यार्थ्यांशी दिलखुलास संवाद



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुणे : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे संविधान कधी ही बदलु शकत नाही.मोदी हे संविधानाला माथा टेकणारे,संविधानाला माननारे आणि संविधान मजबुत करणारे प्रधानमंत्री आहेत असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केले.पुण्यातील एस.पी कॉलेज येथे विद्यार्थ्याशी ना.रामदास आठवले यांचा संवाद आयोजित करण्यात आला होता.यावेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या अनेक प्रश्र्नांना ना.रामदास आठवले यांनी दिलखुलास उत्तरे दिली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर अध्यासन एस.पी कॉलेज आणि रिपब्लिकन पक्षाच्या श्रमिक ब्रिगेड यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी समाज कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी अध्यक्षस्थानी माजी आमदार ऍड .एल.टी सावंत स्वागतअध्यक्ष म्हणुन । पान २ वर

## १० वी, १२ वी परीक्षा प्रवेशपत्र ऑनलाईन मिळणार

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : माध्यमिक (१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (१२ वी) जुलै–ऑगस्ट २०२४ परीक्षेची प्रवेशपत्र ऑनलाईन पद्धतीने मिळणार आहेत. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या ु.इरहरहींलललेरीव.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती मुंबई विभागीय मंडळाचे सचिव डॉ. सुभाष बोरसे यांनी दिली आहे. विद्यार्थ्यांनी संबंधित शाळा /महाविद्यालयाशी संपर्क साधून हॉल तिकीट प्राप्त करावेत. राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांना हॉलतिकीट/प्रवेशपत्रे ऑनलाईन पद्धतीने डाऊनलोड करून मिळणार आहेत. शाळा आणि महाविद्यालये प्रवेशपत्रावर मुख्याध्यापक/ प्राचार्यांचा शिक्का देणार असून, यासाठी कोणतेही शुल्क । पान २ वर




## संपादकीय

### हेच आजचे राजकारण ..

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे नाव या देशाच्या राष्ट्रीय प्रमुख व्यक्तींमध्ये सूचिबध्द झाले असल्यामुळे त्यांचे नाव आणि छायाचित्र आता सर्व पक्षांचे आणि विचारांचे झाले आहे. त्यामुळे सर्वच पक्ष आणि आघाड्या बाळासाहेब ठाकरे यांचे छायाचित्र आणि नाव आपापल्या निवडणूक प्रचारात आणि आघाडीच्या संकल्पनाम्यात किंवा वचननाम्यात वापरू शकतात. आता हा आनंदाचा आणि अभिमानाचाही मुद्दा आहे आणि अडचणींचाही. ज्या विचारांना बाळासाहेबांनी अनुसरले आणि भविष्यातील पिढ्यांनी ते अनुसरावे आणि पुढे न्यावे म्हणून ज्या समर्थ खांद्यावर त्यांनी आपल्या पक्षाची आणि संघटनेची जबाबदारी टाकली त्या उध्दव ठाकरे यांनाच आपल्याच पित्याच्या न्याय हक्कासाठी सर्वोच्च न्यायालयात सतत न्याय मागावा लागत आहे. म्हणून आता बाळासाहेबांच्या शिवसेनेला आणि उध्दव ठाकरे यांना न्याय देण्याची जबाबदारी ही सर्वोच्च न्यायालयाची आणि मुख्य न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांची आहे. या देशात संविधान सर्वोच्च आहे, हेच कायद्याच्या विद्यार्थ्यांना शिकवले जाते. पण राजकारणाचे धडे गिरवताना आम्हाला हे शिकायला मिळाले की, विधानसभा आणि विधान परिषद तसेच लोकसभा आणि राज्यसभा ही सर्वोच्च सभागृह आहेत आणि त्यांच्यासमोर सर्वोच्च न्यायालय देखील थिटे आहे. कारण लोकशाहीच्या मूळ व्याख्येनुसार लोकांनी लोकांसाठी निवडलेले लोकांचे प्रतिनिधी त्या सभेत बसतात आणि कायदे करतात. ते कायदे मंडळ आहे. या कायदे मंडळाने सर्वानुमते किंवा बहुमताने जे कायदे पारित केलेले असतात ते सर्वोच्च न्यायालयालाही मान्य करावे लागतात. मुख्यमंत्री किंवा प्रधानमंत्रीही जेव्हा राज्यकारभार करतात तेव्हा मंत्रिमंडळ जे ठरवते त्यावर मुख्य वा प्रधानपदी बसलेल्याने शिक्कामोर्तब करणे अपेक्षित असते. पण स्वातंत्र्यानंतर आपल्या देशातील सामान्यांची मानसिकता ही राजा बोले प्रजा डोले, अशी असल्यामुळे जो मुख्य वा प्रधानपदी असेल त्याच्याकडेच निर्णयाचे अधिकार जातात. यामुळे काही वेळेला न्याय आणि संविधानही पायदळी तुडवले जाते. जसे यावेळेस झाले. म्हणूनच आता सगळी भिस्त आहे ती केवळ सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींवरच. निवडणूक आयोग आणि सभापती यांनी दिलेले निवाडे सर्वोच्च न्यायालयात निकालासाठी प्रलंबित आहेत. जातीनिहाय प्राधान्य हेच आजचे राजकारण झाले आहे.

# लढवय्या पँथर सोपान गायकवाड काळाच्या पडद्याआड



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे सोलापूर जिल्हा सचिव तथा काजीकणबस ता.अक्कलकोट चे माजी उपसरपंच नामदार रामदासजी आठवले साहेब यांचे निकटवर्तीय मानले जाणारे कार्यकर्ते एक लढवय्या पँथर सोपान यशवंत गायकवाड (आण्णा) यांचे दि.११ जुलै २०२४ रोजी रात्री ११.२२ वा.दरम्यान अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.

दिवंगत सोपान गायकवाड (आण्णा) हे केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे राष्ट्रीय अध्यक्ष नामदार रामदास आठवले साहेब यांच्या नेतृत्वाखाली दलित पाँथरच्या सुरुवातीच्या काळापासून सामाजिक कार्यात सक्रिय होते.दलित पँथरच्या माध्यमातून दलित बहुजन मागासवर्गीय समाजावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध त्यांनी संघर्ष करून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी वेळोवेळी प्रयत्न केला.डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी महाराज नगर (औरंगाबाद) नामांतर लढ्यात ते सक्रिय सहभागी होते.सन १९८९ ला भारतिय दलित पँथरचे नामदार रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया मध्ये विलिनीकरण करण्यात आले तेंव्हा पासून सोपान गायकवाड हे एक झेंडा एक पक्ष एकच नेतृत्व या तत्त्वावर नामदार रामदासजी आठवले यांच्या नेतृत्वाखालीलच जिवनाच्या अखेर पर्यंत आंबेडकरी रिपब्लिकन चळवळीत एक निष्ठ राहीले.

मध्यंतरीच्या काळात ते मुंबई वाशी येथील तुर्भे स्टोअर झोपडपट्टीत वास्तव्यास असताना तुर्भे स्टोअर झोपडपट्टी कायम करण्यात पुढाकार घेऊन बेघर दलित ओबीसी कामगार यांच्या न्याय हक्कासाठी खंबीरपणे नेतृत्व केले.काही काळ मुंबईत घालविल्यानंतर प्रकृतिच्या कारणास्तव परत आपल्या गावी काजीकणबस ता.अक्कलकोट येथे आले.आपला शेती व्यवसाय सांभाळत त्यांनी रिपाइं (आठवले) चे सोलापूर जिल्हा सचिव म्हणून जबाबदारी सांभाळत सामाजिक राजकीय व धम्म कार्यात सक्रिय झाले.गावचे उपसरपंच म्हणून समाजाचे गावचे प्रतिनिधित्व केले.मानवी हक्कापासून वंचित बहुजनांना न्याय मिळवून देण्यासाठी जाणिव पुर्वक प्रयत्न केला.गावात अनेक विकासकामे केली.महामनव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती मध्ये पुढाकार घेऊन जयंती कार्यक्रम शेवटपर्यंत पार पडेपर्यंत सहभागी राहत असत.त्यांच्या अचानक जाण्याने आंबेडकरी चळवळीत खुप मोठी पोकळी निर्माण झाली आहे.अकल्लकोट तालुका ,सोलापूर जिल्हा , मुंबई शहर,व परिसरातील आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते व पदाधिकारी यांचें मार्गदर्शक म्हणून सुपरिचित असलेले सोपान आण्णा गायकवाड यांच्या दु:खद निधनाने सामाजिक न्यायाकरिता मानवी हक्कासाठी लढणारा एक लढवय्या पँथर काळाच्या पडद्याआड झाला.

या जेष्ठ नेत्याला भावपूर्ण आदरांजली.

**एस.के. गायकवाडफ**
**मु.पो.वागदरी ता.तुळजापूर**

# शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने सोहळ्यातील वैष्णवांना अन्नदान सोहळा

## तीस हजार भाकरींचे वाटप, अकरा हजार विद्यार्थ्यांचा सहभाग

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीःअकलूज येथील शिक्षण प्रसारक मंडळाच्या दहा शाखेतून सद्गुरु संत तुकाराम महाराज व श्री संत ज्ञानेश्र्वर महाराज पालखी सोहळ्यातील वैष्णवांना सुमारे ३०००० भाकरी व १२५ किलो बेसनाचे पिठले व ठेचा लोणचे कांदा अशा ग्रामीण आस्वादाचे अन्नदान वाटपाचा प्रारंभ संस्थेचे मार्गदर्शक संचालक जयश्री मोहिते पाटील यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी सचिव अभिजीत रणवरे सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील प्रमुख उपस्थितीत होते व या कार्यक्रमात संस्थेचे सुमारे अकरा हजार विद्यार्थ्यांना सहभाग घेतला आहे




श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे दिनांक १२ जुलै रोजी अकलूज जिल्हा सोलापूर येथे आगमन होते पालखीचा आदल्या दिवशीचा मुक्काम सराटी जिल्हा पुणे येथे असतो व सराटी व अकलूज हे अंतर केवळ तीन किलोमीटर असल्याने त्या अकलूज येथे मुक्कामाच्या मोठ्या सुविधा असल्याने लाखो वैष्णव आदल्या दिवशी मुक्कामाला अकलूजला येतात व आदल्या दिवशी मुक्काम मास येणाऱ्या वैष्णवांनाही अन्नदान व्हावे त्यासाठी घरगुती भोजनाचा आस्वाद मिळावा या येथूनच जैसीय मोहिते पाटील यांनी सन २०१५ पासून शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने अन्नदानाला सुरुवात केली तीच परंपरा अध्यक्ष संग्राम सिंह मोहिते पाटील संचालिका स्वरूपात आणि मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे

अन्नदान वाटपाचे ते दहावे वर्ष आहे अकलूज सराटी महामार्गावर झालेल्या अन्नदानात सदाशिव माने महाविद्यालय अकलूज महर्षी शंकरराव मोहिते पाटील प्रशाला यशवंत नगर जिजामाता कन्या प्रचारा कनिष्ठ महाविद्यालय अकलूज लक्ष्मीबाई कन्या प्रशाला यशवंत नगर महर्षी शंकरराव मोहिते प्रशाला प्राथमिक विभाग श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील घरा विज्ञान महिला महाविद्यालय अकलूज या सहा शाखेतून सुमारे ९००० विद्यार्थी अन्नदानात सहभागी झाले होते व २१००० भाकरी व ७० किलो बेसन पिठले व ठेसा लोणचे कांदा असा ग्रामीण वजनात आस्वाद वैष्णवांना दिला

श्री संत ज्ञानेश्र्वर महाराज पालखी सोहळ्यासाठी संस्थेचे सदाशिवनगर येथील कर्मवीर बाबासाहेब पाटील महाविद्यालय ज्युनिअर कॉलेज सदाशिवनगर यांच्या वतीने मांडावी घोडा विसावा येथे दिनांक १२ जुलै रोजी ५००० भाकरी व २५ हजार किलो बेसन ठेसला लोणचे असे अन्नदान होत असून यामध्ये सुमारे एक हजार तीनशे विद्यार्थी सहभागी होत आहेत वेळापूर येथील सहकार महर्ष शंकरा मोहिते पाटील प्राथमिक विद्यालय व अर्धनारी नटेश्र्वर महाविद्यालय वेळापूर यांच्या वतीने १३ जुलै रोजी ४००० भाकरी व २५ किलो बेसन ठेचा लोणचे असे अन्नदान होत असून त्यामध्ये एक हजार विद्यार्थी

यावेळी मुख्याध्यापक संजय गळतीकर अमोल फुले शिवाजी पार्कचे मुख्याध्यापिका वाघ प्राध्यापक राहुल सुर्वे अनिल पिसे विजय निंबाळकर दत्तू सरतापे प्राध्यापक मनोज नांगरे आधी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते

पान १ वरुन

### प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे संविधान..

शिक्षण प्रसारमंडळीचे चेअरमन एस के जैन उपस्थित होते.यावेळी तिसऱ्यांदा केंदिय राज्यमंत्री पदी निवड झाल्याबद्दल ना.रामदास आठवले यांचा भव्य सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे आयोजन सतिष केदारे,रिपाइं महिला आघाडीच्या संघमित्रा गायकवाड,कुमार ढवळे, विष्णू भोसले आदिंनी केले.या कार्यक्रमात एस.पी कॉलेज चे प्राचार्य सुनिल गायकवाड,रिपाइंचे पश्र्िचम महाराष्ट्र अध्यक्ष सुर्यकांत वाघमारे,परशुराम वाडेकर.शैलेश चव्हाण,श्रीकांत कदम,संजय सोनावणे,बाळासाहेब जानराव,कुमार व्हावळकर, डॉ.सिध्दार्थ धेंडे आदि अनेक मान्यवर उपस्थित होते. शिक्षण प्रसारक मंडळी ही शिक्षण संस्था सन १८८८ साली स्थापन झाली आहे.एस.पी कॉलेज चे दहा हजार विद्यार्थी आहेत.महाराष्ट्रातील अग्रगन्य हि शिक्षण संस्था आहे.या शिक्षण संस्थेचे अध्यक्ष एस के जैन यांना शिक्षण क्षेत्रातील योगदाना बदल पिपल्स एज्युकेशन सोसायटी तर्फे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर अवॉर्ड केंद्रिय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.यावेळी विद्यार्थांनी रिपब्लिकन पक्ष इतर राजकिय पक्षां पेक्षा वेगळा कसा याबाबत प्रश्र्न विचारले. त्या प्रश्र्नाला ना.रामदास आठवले यांनी उत्कृष्ठ उत्तर दिले.महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी रिपब्लिकन पक्षाची स्थापना केली आहे.संविधानीक मुल्यांचे उद्दिष्ट्य बाळगुन धर्मनिरपेक्ष म्हणुन रिपब्लिकन पक्ष काम करित आहे.सर्व जाती धर्मीयांना सोबत घेऊन परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करणार रिपब्लिकन पक्ष आहे असे ना.रामदास आठवले म्हणाले.केंद्रिय राज्यमंत्री रामदास आठवले यांचा विद्यार्थ्यांशी झालेला संवाद सर्व उपस्थितांसाठी अविस्मरणीय ठरला. अशी माहिती या कार्यक्रमास उपस्थित राहिलेल्या रिपाइं च्या महिला नेत्या संघमित्राताई गायकवाड यांनी दिली.

### हरी नामाच्या गजरात..

हरी नामाचा गजर करीत पालखी सोहळ्याबरोबर काही अंतर गेले.

*सातारा प्रशासनाच्या वतीने भावपूर्ण निरोपः सोलापूर जिल्ह्यात माऊलींच्या पालखीचे आगमन सकाळी १०.४० वाजता धर्मपुरी बंगला येथे झाले. तत्पूर्वी , सातारा जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी जितेंद्र दुद्दी, मुख्य कार्यकारी अधिकारी यासणी नागराजन, पोलीस अधीक्षक समीर शेख, फलटणचे उपविभागीय अधिकारी सचिन ढोले यांच्यासह जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांनी माऊलींच्या पालखीला भावपूर्ण निरोप दिला.

*जय हरी विठ्ठल, जय हरी विठ्ठल नामघोषाने आसमंत दुमदुमला...

टाळी वाजवावी, गुढी उभी रहावी, वाट ती चालावी पंढरीची या संत वचनानुसार टाळ मृदंगाचा गजर आणि मुखाने जय हरी विठ्ठल... जय हरी विठ्ठल, ज्ञानोबा... तुकाराम चा जयघोष करीत वारकरी पालखी सोहळ्यात तल्लीन झाले होते. प्रत्येक वारकऱ्याच्या चेहऱ्यावर विठ्ठलाच्या दर्शनाची आस दिसत होती. विठुरायाच्या दर्शनाच्या ओढीने वारकरी पंढरीचे अंतर एक एक पाऊल जवळ करीत होता.

*वारकऱ्यांच्या सेवेसाठी प्रशासन सज्ज, वारकऱ्यांसाठी फूट मसाजची व्यवस्थापालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या प्रत्येक वारकऱ्याला आवश्यक सेवा देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने सर्व तयारी केली आहे. पालखी मार्गावर स्वच्छ पिण्याचे पाणी, पुरेशी शौचालये, आरोग्य सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. हिरकणी कक्षाच्या माध्यमातून महिला वारकरी मंडळी तसेच लहान मुलांसाठी उत्कृष्ट सेवा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तसेच वारकऱ्यांना पायी चालून त्रास होऊ शकतो त्यामुळे त्यांना आराम मिळावा यासाठी फूट मसाज मशीन सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. वारकरी भाविकांना वारीत कोणत्याही प्रकारच्या समस्या उद्भवू नयेत यासाठी प्रशासनाने योग्य ती खबरदारी घेतली आहे. धर्मपुरी येथे पालखी अगमनापूर्वी सोलापूर जिल्हा परिषदेच्या वतीने विविध जनजागृतीपर कार्यक्रम सादर करण्यात आहे. यामध्ये आरोग्य शिक्षण, लेक लाडकी, पर्यावरण रक्षण, प्रदूषण मुक्ती, स्वच्छ्ता या विषयांचा प्रामुख्याने समावेश होता. दर्शनासाठी भाविकांची गर्दी : सोलापूर जिल्ह्यातील पालखी प्रवेशानंतर माऊलींची पालखी पाटबंधारे विभागाच्या विश्रामगृह येथे विसाव्यासाठी थांबली असता पालखीच्या दर्शनासाठी परिसरातील वारकरी भाविक व ग्रामस्थांनी अलोट गर्दी केली होती.नातेपुते येथे पालखीचा मुक्कामः धर्मपुरी येथे विसावा घेतल्यानंतर सोलापूर जिल्ह्यातील पहिल्या मुक्कामासाठी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्र्वर माऊलीची पालखी नातेपुते कडे मार्गस्थ झाली.

**संत तुकाराम महाराज पालखी प्रवेश व रिंगण** शुक्रवारी एकीकडे माउलींचे पुरंदवडे येथे पहिले गोल रिंगण होणार आहे, तर दुसरीकडे संत तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा सोलापूर जिल्ह्यात प्रवेश करणार आहे. अकलूज येथे तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे गोल रिंगण होणार आहे.

### आषाढी पालखी सोहळ्यातील

या जाणिवेतून, श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती मार्फत आषाढी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार सन २०१८ पासून सुरू करण्यात आला आहे.

आषाढी पालखी सोहळ्यातील पहिल्या तीन क्रमांकाच्या दिंड्यांना आषाढी एकादशी दिवशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सन्मान चिन्ह व रक्कमेचा (प्रथम रू.१ लक्ष, द्वितीय रू.७५ हजार व तृतीय रू.५० हजार) धनादेश देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. त्यासाठी ड.माधवी निगडे, ह.भ.प.प्रकाश जवंजाळ, वृक्षमित्र ह.भ.प.शिवाजीराव मोरे या मंदिर समितीच्या तीन सदस्याची समिती गठीत करण्यात आली असल्याचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगीतले.

### सशस्त्र दलात १० टक्के पदे राखीव

प्रतिक्रिया दिली आहे. माजी अग्निवीर जवानांकडे चार वर्षांचा अनुभव असेल, तसेच ते प्रशिक्षित असतील. बीएसएफसाठी हे फायद्याचं ठरेल. असे ते म्हणाले. तसेच रेल्वे संरक्षण दलातील कॉन्स्टेबल पदाच्या सर्व भरतींमध्ये माजी अग्निवीरांना १० टक्के आरक्षण असेल, अशी प्रतिक्रिया आरपीएफचे महासंचालक मनोज यादव यांनी दिली. भारतीय सैन्यदलांत १७.५ ते २१ वर्षे या वयोगटातील तरुणांना अग्निवीर म्हणून सेवेची संधी दिली जाते. चार वर्षांच्या कालावधीसाठी (प्रशिक्षण काळासह) त्यांना समाविष्ट केले जाते. तसेच त्यांना महिन्याला ३० ते ४० हजार रुपये वेतन (लागू असल्यास स्वतंत्र भत्ता) दिले जाते. प्रत्येक अग्निवीरास मासिक वेतनातील ३० टक्के रक्कम अग्निवीर समूह निधीत द्यावी लागते. यातून कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर त्यांना सेवा निधी अंतर्गत ११.७१ लाख रुपये दिले जातात. कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर त्यांना कामगिरीच्या आधारे स्थायी सेवेत दाखल केले जाते. प्रत्येक तुकडीतील २५ टक्के अग्निवीरांना या पद्धतीने स्थायी सेवेत स्थान देण्यात येते.

### १० वी, १२ वी परीक्षा ..

आकारण्यात येणार नाही. हॉल तिकीटामध्ये विषय व माध्यम बदल, फोटो, स्वाक्षरी, विद्यार्थ्यांचे नाव या संदर्भातील दुरूस्त्या असतील तर विद्यार्थ्यांनी त्वरीत शाळेस/महाविद्यालयास कळवावे. प्रवेशपत्र गहाळ झाल्यास शाळा संबंधित विद्यार्थ्यांना प्रवेशपत्राची पुन्हा प्रिंट काढून दुय्यम प्रत (डुप्लीकेट) असा उल्लेख करून प्रवेशपत्र उपलब्ध करून देणार असल्याची माहिती राज्य मंडळाचे सचिव शैलेंद्र पाटील यांनी सांगितले आहे.

### मणिपूर मुद्द्यावर सरकारवर दबाब


आणि हजारो कुटुंबांना मदत छावण्यांमध्ये आपले जीवन व्यतीत करावे लागत आहे,'' असे राहुल या वेळी म्हणाले. पंतप्रधानांनी वैयक्तिकरित्या मणिपूरला भेट द्यावी, राज्यातील लोकांच्या समस्या ऐकून घ्याव्यात आणि शांततेचे आवाहन करावे, असेही गांधी म्हणाले. २२ जुलैपासून सुरू होणाऱ्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनात मणिपूरचा मुद्दा उपस्थित करणार असल्याचे त्यांनी सांगितले.मणिपूरमधील त्यांच्या मुक्कामादरम्यान, राहुल गांधींनी राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यांतील तीन मदत छावण्यांना भेट दिली. हिंसाचारामुळे विस्थापित झालेल्या मैतेई आणि कुकी या दोन्ही गटांतील लोकांशी संवाद साधला. राहुल गांधींच्या भेटीची पाच मिनिटांची चित्रफीत टॅग करत काँग्रेस सरचिटणीस प्रियंका गांधी वढेरा म्हणाल्या की, ''मणिपूर अस्थिर होऊन एक वर्षाहून अधिक काळ लोटला आहे. तेथील लोकांना हिंसाचार, खून, दंगली आणि विस्थापनाचा सामना करावा लागत आहे. हजारो निष्पाप लोकांना मदत छावण्यांमध्ये राहायला भाग पाडले जात आहे. अखेर पंतप्रधान मणिपूरवर कधी बोलणार? मणिपूरमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी सरकारने प्रयत्न का केले नाहीत?'' अशी विचारणा करताना प्रियंका दिसत आहेत.गेल्या वर्षी ३ मे रोजी ईशान्येकडील राज्यात वांशिक हिंसाचार सुरू झाल्यानंतर गांधींनी मणिपूरलाही भेट दिली होती. जानेवारी २०२४ मध्ये त्यांनी मणिपूरमधून 'भारत जोडो न्याय यात्रा' सुरू केली.

### भारतानं जगाला बुद्ध दिला,

दृष्टीने एक महत्त्वाचा दौरा आहे. इतक्या वर्षांपासूनची ही प्रतीक्षा एका ऐतिहासिक क्षणी संपली आहे. भारत आणि ऑस्ट्रिया त्यांच्या मैत्रीची ७५ वर्षं पूर्ण करत आहेत, असं मोदी म्हणाले.

भारत आणि ऑस्ट्रिया भौगोलिकदृष्ट्या दोन टोकाच्या ठिकाणी आहेत. पण आपल्यामध्ये अनेक साम्यदेखील आहेत. दोन्ही देशांना लोकशाही बांधून ठेवते. स्वातंत्र्य, समता, विविधता आणि कायद्याचा सन्मान ही मूल्य दोन्ही देशांसाठी समान महत्त्वाची आहेत. आपले समाज बहुसांस्कृतिक आणि बहुभाषिक आहेत. दोन्ही देशांमध्ये विविधता दिसून येते. ही सर्व मूल्य दोन्ही देशांमधल्या निवडणुकांमध्ये परावर्तित होत असतात, असंही पंतप्रधान मोदींनी नमूद केलं.

ऑस्ट्रियाचे राष्ट्राध्यक्ष अलेक्झांडर वॅन डेर बेलन आणि चॅन्सेलर कार्ल नेमर यांच्याशी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी या दौऱ्यादरम्यान चर्चा केली. यावेळी वेगवेगळ्या क्षेत्रांमधील द्वीपक्षीय सहकार्य वाढवण्यावर भर देण्यासंदर्भात सहमती झाली. यात पर्यावरण संरक्षणासंदर्भातला मुद्दा प्रामुख्याने चर्चेत आला. त्याशिवाय, युक्रेन युद्ध आणि पश्र्िचम आशियातील तणावासंदर्भातही दोन्ही बाजूच्या प्रमुख नेत्यांमध्ये चर्चा झाली.




हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या ३७ वा. वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा उत्सवानिमित्त धर्मसंकीर्तन व सांस्कृतिक कार्यक्रम २०२४ यंदाच्या रौप्यमहोत्सवाचा शानदार शुभारंभ



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या ३७ वा. वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा उत्सवानिमित्त धर्मसंकीर्तन व सांस्कृतिक कार्यक्रम २०२४ यंदाच्या रौप्यमहोत्सवाचा शानदार शुभारंभ न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली दि. ११ जुलै रोजी गुरुवार सायंकाळी ६.३० वा. विरक्त मठाचे श्री म.नि.प्र. पूज्य बसवलिंग महास्वामीजी, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे मुख्य पुरोहित प.पू.श्री मंदार पुजारी, श्री स्वामी समर्थ समाधी मठाचे पुजारी वे.शा.सं.श्री अण्णू महाराज, तहसिलदार विनायक मगर, नगर परिषदेचे मुख्याधिकारी सचिन पाटील, उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी शंकरराव कवितके, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे विश्र्वस्त आत्माराम घाटगे, अप्पर तहसीलदार श्रीकांत कांबळे, वे.मु.बसवराज शास्त्री तीर्थ आदी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करुन पहिल्या पुष्पाचे उद्घाटन करण्यात आले.

दरम्यान श्रींची प्रतिमा, नटराज व स्वर्गीय लतादीदी मंगेशकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर थोर संगित दिग्दर्शक व गायक पद्मश्री पंडीतजी हृदयनाथ मंगेशकर यांच्या मार्गदर्शनाखाली राधा मंगेशकर आणि सहकारी मुंबई यांचा 'नक्षत्रांचे देणे, कार्यक्रम सादर करण्यात आला. यांच्या समवेत केतन गोडबोले, केदार परांजपे, यश भंडारे, नितीन कुलकर्णी, विशाल गुंडतवार, ऋतुराज कोरे, सोनाली श्रीखंडे यांनी साथ दिली. या सर्व कलाकारांचा न्यासाच्या वतीने सत्कार करण्यात आला.उद्घाटन सोहळ्यास उपस्थित मान्यवरांचा सत्कार अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा कृपावस्त्र देऊन करण्यात आला. न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी यांच्या हस्ते यथसांग मंत्र पठणाने श्री स्वामी समर्थांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

**गुणीजन गौरव : सतीश संगोळगी (कृषी सहायक), चिदानंद उपाध्ये (पोलीस कॉन्स्टेबल), गणेश पवार (एस.टी.चालक अक्कलकोट आगर), शंकर पुकाळे (एम.एस.ई.बी) यांचा न्यासाच्या वतीने गुणीजन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.**

**गुणवंत विद्यार्थी गौरव : तालुक्यातील इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत उत्तम गुण मिळवलेल्या ५ गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव न्यासाच्या वतीने करण्यात आला.**

**शुक्रवार दि. १२ जुलै रोजी सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत 'एक भाव मैफिल' स्वर आर्या लोकप्रिय मराठी भावगीते व भक्तिगीते सादरकर्ते आर्या आंबेकर व सहकलाकार मुंबई यांचा कार्यक्रम सादर होणार आहे.**

**स्वामी सेवा रुजू :** भारतरत्न स्व.लतादीदी व जन्मेजयराजे भोसले यांचे अतिशय सलोख्याचे संबंध राहिलेल्या आहे. भोसले महाराजांनी वेळोवेळी दीदींच्या प्रती आपला आदर व्यक्त केलेला आहे. भोसले आणि मंगेशकर कुटुंबियांचे पूर्वीपासून जिव्हाळ्याचे संबंध आहेत, गुरुपोर्णिमेचे औचित्यसाधून महाराजांनी मंडळाचा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा उत्सवानिमित्त धर्मसंकीर्तन व सांस्कृतिक कार्यक्रमाची प्रथा सुरु केली. ती आज तागायत त्यांचे पुत्र न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांनी सुद्धा तशीच सेवा वडिलांच्या पाऊलावर पाऊल ठेऊन आपली स्वामी सेवा रुजू करतायेत यंदाचे रौप्यमहोत्सवी वर्ष आहे.

**– पद्मश्री पंडीतजी हृदयनाथ मंगेशकर, मुंबई**

राधा मंगेशकर यांच्या नक्षत्राचे देणे या कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयदेव जयदेव जय शिवराया, जय शिवराया, विश्र्वाचा..! जय जय स्वामी समर्थ..!, शरद सुंदर.., काय बाई सांगू .., लावण्याची झाली.. ए जिंदगी..., रजनी गंदा...,आदी मराठी व हिंदी गाण्यांनी उपस्थित श्रोत्यांची मने जिंकली. मंडळाच्या ३७ वा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सवाचा शानदार शुभारंभास श्रोतेगणांची प्रचंड गर्दी झाली होती. यावेळी न्यासाचे विश्र्वस्त अलकाताई भोसले, अर्पिताराजे भोसले, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, हिरकणी संस्थेच्या जयश्री मगर, स्वाती निकम, स्मिता कदम, पल्लवी नवले, कविता वाकडे, क्रांती वाकडे, संगीता भोसले, अंजना पवार, उज्वला भोसले, कोमल क्षीरसागर, सुवर्णा घाडगे, छाया पवार, रुप पवार व न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्र्वस्त भाऊ कापसे, जेष्ठ नेते सुरेशचंद्र सूर्यवंशी, माजी उपनगराध्यक्ष दिलीप सिद्धे, किशोर सिद्धे, राजेंद्र लिंबीतोटे, संतोष भोसले, मनोज निकम, प्रा.शरणप्पा आचलेर, ओंकारेश्र्वर उटगे, अरविंद शिंदे, शीतल फुटाणे, राजु नवले, मनोज हिंगोले, निखील पाटील, प्रवीण घाडगे, गोटू माने, संजय गोंडाळ, सौरभ मोरे, वैभव मोरे, विशाल कलबुर्गी, फहीम पिरजादे, अमित थोरात, बाळासाहेब घाटगे, पिंटू दोडमनी, योगेश कटारे, अभिजित लोकापुरे, प्रितेश किलजे, रणजीत गोंडाळ, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, दत्ता माने, प्रसाद हुल्ले, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठलराव रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण, श्रोते बहुसंख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन श्र्वेता हुल्ले यांनी केले. तर न्यासाचे सचिव शामराव मोरे यांनी आभार मानले.

## हत्तीकणबस येथे अनोखा आनंदसोहळा संपन्न...

### तंटामुक्त अध्यक्ष बसवराज बिराजदार यांनी नातवांचा वाढदिवस जिल्हा परिषद शाळेला देणगी देऊन केला साजरा

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः हत्तीकणबस येथील तंटामुक्त अध्यक्ष श्री. बसवराज माणिक बिराजदार यांनी आपल्या लाडक्या सातवांचा वाढदिवस जिल्हा परिषद शाळेला देणगी देऊन केला साजरा...



चि. प्रद्युम्न पंडित बिराजदार आणि प्रज्ञा मल्लिनाथ बिराजदार या दोन नातवांचा पहिलाच वाढदिवस आपल्या परिवाराचा हा आनंदसोहळा साजरा करताना अनावश्यक खर्चाला फाटा देऊन शाळेतील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी रुपये ५०००/-ची देणगी देवून हा वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा साजरा केला. शाळेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त करत त्यांनी सर्व स्टाफला शुभेच्छाही दिल्या. इयत्ता पहिली पासून सेमी इंग्रजी वर्ग सुरू केल्याच्या आनंदात त्यांनी आपल्या नातवांचा पहिला वाढदिवस विद्यार्थ्यांसोबत शाळेतच साजरा करण्याची भावना व्यक्त केली. याशिवाय पुढील पाच वर्ष हा वाढदिवस सोहळा शाळेला ५०००/- रुपये देणगी देऊन साजरा करणार असल्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला. त्यांच्या या दानशूर वृत्तीचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांच्या या वृत्तीचा इतरांनीही आदर्श घ्यावा अशी चर्चा गावात रंगली आहे. शाळेला गावाचा आधार आणि गावाला शाळेचा अभिमान असावा असे म्हटले जाते. याचा प्रत्यक्ष अनुभव या आनंद सोहळ्याला गावचे सरपंच श्री. श्रीशैल माळी साहेब, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. देवेंद्र बिराजदार, उपाध्यक्ष श्री. पंचप्पा घोडके,

श्री. गुरुअण्णा उण्णद (ग्राम पंचायत सदस्य), माजी सरपंच श्री. गायकवाड, श्री. संजय हिरापुरे (ग्राम पंचायत सदस्य), अंगणवाडी सेविका सौ. नंदर्गी मॅडम, सौ. धडके मॅडम, कुंभार ताई व अनेक पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा आनंदसोहळा साजरा करण्याचे नियोजन शाळेचे मा. मुख्याध्यापक श्री. इस्माईल मुर्डी सर यांनी विशेष परिश्रम घेतले. गावातील पालकांनी शाळेच्या प्रगतीला हातभार लावला पाहिजे, पालक शाळेचा आधारस्तंभ आहेत अशी भावना श्री. इस्माईल मुर्डी सर यांनी व्यक्त केली. गावकऱ्यांचा विश्र्वास संपादन करून शाळा आणि पालक यांच्यात अतूट नाते निर्माण करण्यात श्री. मुर्डी सर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. हा आनंद सोहळा साजरा करण्यात शाळेतील शिक्षिका सौ.उषा गायकवाड, प्रभारी मुख्याध्यापक श्री. शिवानंद मंगरूळे, तसेच शिक्षक श्री.राजाराम सुरवसे, श्री.अरुण पांचाळ, श्री.शितल डावरे, श्री.विक्रम जाधव सौ.बबिता कोरेकर यांनी परिश्रम घेतले.

सदर आनंदसोहळा कार्यक्रम अक्कलकोट तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी श्री. प्रशांत आरबळे साहेब, मैंदर्गी बीटचे विस्तार अधिकारी श्री. सोमशेखर स्वामी साहेब, हत्तीकणबस केंद्राचे केंद्रप्रमुख श्री. सुरेश शटगार यांनी अतिशय कौतुकास्पद असल्याचे सांगितले.

## घोळसगावच्या जि.प. शाळेला पवित्र पोर्टल द्वारे मिळाला शिक्षक ग्रामस्थांनी केले स्वागत

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/महेश गायकवाड : घोळसगावच्या जि.प. शाळेला पवित्र पोर्टल द्वारे शिक्षकाची नियुक्ती करण्यात आली आहे. गावच्या शाळेला शिक्षक मिळाला यांमुळे शिक्षकाचे ग्रामस्थांनी केले स्वागत केले व सत्कार केला. घोळसगाव जिल्हा परिषद मराठी शाळा येथे पवित्र पोर्टलद्वारे शासनाकडून मुरलीधर किसन वागदकर सर यांची नियुक्ती करण्यात आली आहे त्यामुळे ग्रामपंचायत घोळसगाव च्या वतीने नवनियुक्त वागदरकर सरांचे स्वागत करून त्यांचा शाल, हार पुष्पगुच्छ व स्वामी समर्थांचे प्रतिमेचे भेट देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रगतशील शेतकरी संजय होळे हे होते, यावेळी वागदरकर सर यांचा सत्कार गावचे युवा सरपंच राजशेखर किवडे व गावचे ग्रामसेवक विक्रम घाटे यांच्या हस्ते करण्यात आला.

.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ठाकर सर यांनी केले शाळेची होत असलेल्या प्रगतीबद्दल घाटे सर यांनी आपल्या मनोगतनातून शिक्षकांचे कौतुक केले व



शाळेसाठी ग्रामसेवक विक्रम घाटे आणि सरपंच राजशेखर किवडे यांनी मुला मुलीसाठी नवीन शौचालय बांधून देऊ तसेच शाळेमध्ये लवकरात लवकर लाईट फिटिंग व फॅन ची व्यवस्था करून देण्याची आश्र्वासन दिले या कामांची ग्वाही होताच विद्यार्थ्यांकडून टाळ्यांच्या गजरात त्यांचे आभार मानले. शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने ग्रामसेवक व सरपंच यांचा सत्कार करण्यात आला. शाळा समितीचे अध्यक्ष रामेश्र्वर पाटील यांनी शासन व पत्रकार बंधूंचे आभार व्यक्त केले, कारण शाळेला पटसंख्यानुसार एक शिक्षकाची गरज होती वर्षभर पत्रकार बंधूंनी या कडे लक्ष देवुन वाचा फोडली असे सांगीतले. शालेय व्यवस्थापन समितीच्या च्या वतीने प्रशासनाला देखील शाळेसाठी शिक्षकाची गरज आहे असा पाठपुरावा वारंवार करण्यात आला होता. याचेच फळ म्हणून शाळेला पवित्र पोर्टलद्वारे आज वागदरकर सराची नियुक्ती झाले आहे. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शाळेचे मुख्याध्यापक मोरे सर यांनी केले या कार्यक्रमाला दरेकर सर, गुंजोटी सर, सरपंच राजशेखर किवडे ग्रामसेवक घाटे साहेब,गावातील प्रतिष्ठित संजय होळे,अब्दुल मकानदार,रामेश्र्वर पाटील,रवीकांत मंगरूळे,गुंडेराव जगताप,गणेश पाटील,महेश बादोले, वैजनाथ हागरगे व श्रीशैल होळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## पुण्यातील रॉक ऑन व्हील स्केटिंग अकॅडमीच्या मुलांचा विश्वविक्रम

### १५ स्केटिंग पटुंची 'गिनीज बुक' ऑफ वर्ल्ड मध्ये रेकॉर्ड

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुणे/अमोल धडकेः बेळगाव येथील शिवगंगा रोलर स्केटिंग क्लब आयोजित ' गिनीज बुक ऑफ वर्ल्ड' रेकॉर्ड कार्यक्रमांत कात्रजच्या विजय मलजी टीम रॉक ऑन व्हील स्केटिंग अकॅडमीच्या छोट्या १५ स्केटिंग पटुंची नोंद झाली आहे.

सलग ७५ तास रिलेमध्ये १०० मीटर अंतर १४.८४ सेकंदात पूर्ण केले.शिवगंगा रोलर स्केटिंग क्लबतर्फे बेळगावात २८ ते ३१ मे या कालावधीत २०० मीटरच्या स्केटिंग ट्रॅकवर सलग ७५ तास रीले १०० मीटर बॅकवर्ड ऑन स्केट्स युजींग टूव्हेलची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड साठी करण्यात आली. यामध्ये रॉक ऑन व्हील स्केटिंग अकॅडमीच्या

३.५ ते १४ वयोगटातील १५ खेळाडूंनी भाग घेतला होता. पुण्यातील स्लोक दोषी,विश्र्वजित शेंडे ,ऋषभ चिकमळ, आविष्कार घाटे,सात्विक गरड



,पियूष कुऱ्हाडे,साई खरात, आदिराज येवले,रूद्र दराडे, सम्यक गवई, देवांश गोसावी, शांभवी गोगावले, दुर्वा वाघ, राधा नगरकर, आशनी मल्होत्रा, या स्केटिंग पटुंनी १०० मीटर अंतर १४.८४ सेकंदात पार करून हे रेकॉर्ड केले. त्यांना बेळगावच्या ज्योती चिंडक,निखिल चिंडक यांच्या हस्ते पदक आणि प्रमाणपत्र देण्यात आले.या खेळाडूंना रॉक ऑन व्हील स्केटिंग अकॅडमीचे प्रशिक्षक विजय मलजी,सहाय्यक शिल्पा कुऱ्हाडे ,सायली नगरकर, यांनी मार्गदर्शन केले. या सर्व १५ रेकॉर्ड खेळाडूंना प्रशिक्षक विजय मलजी, सहाय्यक शिल्पा कुऱ्हाडे,सायली नगरकर यांच्या हस्ते सर्व पालकांच्या उपस्थिती मध्ये प्रमाणपत्र देण्यात आले.या सर्व खेळाडूंचे सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## उमरगा तालुक्यातील शेतशिवारात घुमू लागला घुंगरमळ्याचा आवाज

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

उमरगा/प्रतिनिधी :उमरगा तालुक्यातील येणेगूर,मुरूम, बलसुर, येळी, डाळिंब, कोराळ, तुगांव,सुपतगावसह परिसरातील शेतशिवारामध्ये मृग नक्षत्रात पडलेल्या समाधानकारक पावसामुळे सोयाबीनच्या पिकांची कोळपणीची कामे वेगाने सुरु झाल्याने शेत शिवारामध्ये बैलांच्या गळ्यात बांधलेल्या घंटीचा आवाज छन?छन? असा घुमू लागला आहे.

गेल्यावर्षी खरीप हंगामात परतीचा पडलेला पाऊस व पिकावरील रोगामुळे शेतकऱ्याच्या हाती काहीच लागले नव्हते. तर सोयाबीनवर मोझ्याक रोग पडल्यामुळे उत्पादनात घट आलेली होती.

यंदा पाऊस समाधानकारक असला तरी सोयाबीनच्या कोवळ्या पिकाच्या पानावर लष्करीअळीने हल्ला केला असून पानाची चाळणी होत असल्याचे दिसून येत आहे. शिवाय सध्या पावसाने उघडीप दिल्याने पिक तणविरहित करण्यासाठी शेतकरी बैलजोडीच्या सहाय्याने कोळपणी करण्यासाठी शेतकरी पसंती देत आहेत. ट्रॅक्टरच्या सहाय्याने कमी दिवसात, कमी खर्चात पैशाची बचत करून शेती व्यवसाय केला जात असला तरी




मजुरावर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली आहे. मात्र, आजही बहुतांश शेतकरी पारंपरिक पद्धतीने शेती करण्याला प्राधान्य देत आहेत. त्याच मुळे बैलांच्या गळ्यातील घंटीचा आवाज शेतशिवारात पुन्हा घुमू लागला आहे.शेतशिवारात सोयाबीनचे पिक समाधानकारक असल्याने बैल जोडीच्या मशागतीसाठी मोठी मागणी होत आहे. ज्यांच्याकडे बैल जोडी आहे असे काही शेतकरी घरच्या शेतातील सोयाबीनची कोळपणी करून इतर शेतकऱ्याच्या शेतामध्ये दिवसाला दोन हजार रुपया प्रमाणे किंवा एकरी पाचशे या प्रमाणे कोळपणी करून देत आहेत.

# वाढती लोकसंख्या भारताच्या प्रगतीतला मुख्य अडसर : डॉ. रत्नमाला देसाई

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः तरुण तरुणांनी विवाहा नंतर पहिले मूल झाल्यावर थांबावे. गरज असल्यासच दुसरे मूल होऊ देण्याचा विचार करावा, मुलगा किंवा मुलगी यांचा अट्टाहास धरू नये. कारण त्यामुळेच भारताची लोकसंख्या वाढत गेली. नैसर्गिक साधन संपत्ती वर ताण पडत गेला. आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक आरोग्य विषयक सुविधा अपुऱ्या पडू लागल्या म्हणूनच वाढती लोकसंख्या भारताच्या प्रगतीतला मुख्य अडसर ठरलेली आहे म्हणूनच देशाची प्रगती अपेक्षित गतीने झालेली नाही असे प्रतिपादन फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियाच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. रत्नमाला देसाई यांनी केले.



त्या फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा व वालचंद शिक्षण समूह अंकित वालचंद कला व विज्ञान महाविद्यालय, हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या भव्य जनजागरण दिंडीचे आयोजन करण्यात आले होते त्याच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बालाजी अमाईन्स प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक डी. राम रेड्डी उपस्थित होते.

यावेळी मंचावर प्राचार्य डॉ. संतोष कोटी, प्राचार्य डॉ. सत्यजित शहा, प्राचार्य डॉ. अश्विन बोंदार्डे, प्राचार्य डॉ.राजशेखर हिरेमठ, डॉ. मल्लिनाथ देसाई, प्राचार्य डॉ. राम ढोले सर, प्राचार्य डॉ. एस. बी. क्षिरसागर, प्राचार्य डॉ. गायकवाड, डॉ. शिवाजीराव देशमुख, अश्विनी सहकारी रुग्णालयाचे संचालक अशोक लांबतुरे, फॅमिली प्लॅनिंगचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, व्हाईस चेअरपर्सन प्रा. डॉ. आयेशा रंगरेज, डॉ. विजया महाजन, इंडियन रेडक्रॉस सोसायटी सोलापूर शाखेचे चेअरमन डॉ. राजीव प्रधान, बालाजी अमाईन्स सी. एस. आर. विभागाचे प्रसाद सांजेकर, डॉ. अमोल शिंदे, डॉ. किरण चौगुले, डॉ.दत्ता वाघमारे, डॉ. रामचंद्र गोरे, डॉ. श्रीनिवास जगताप, राहुल हजारे, कॅप्टन संदीप पाटील, ऐश्र्वर्या सावंत, अपेक्षा सावंत, लक्ष्मण रत्नाकर आदी उपस्थित होते. यावेळी डी. राम रेड्डी यांनी लोकसंख्या दिन जनजागरण दिंडीस शुभेच्छा दिल्या.

या दिंडीत वालचंद कला व विज्ञान महाविद्यालय, हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, एस. व्ही.सी.एस. ज्युनिअर कॉलेज, भवानी पेठ, एस. व्ही.सी.एस. अध्यापक विद्यालय, अक्कलकोट रोड, संगमेश्र्वर महाविद्यालय, वसुंधरा कला व विज्ञान महाविद्यालय, अश्विनी कॉलेज ऑफ नर्सिंग, ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय,

शेठ गोविंदजी रावजी आयुर्वेद महाविद्यालय, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था मुलांचे, भाई छनुसिंह चंदेले कॉलेज ऑफ सोशल वर्क, हिराचंद नेमचंद कॉलेज एन. सी. सी. विभाग, श्रविका कॉलेज, छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालय, डी.ए.व्ही. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स, मंगळवेढेकर कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, डी.पी. बी. दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन, नेटवर्क ऑफ सोलापूर बाय पीपल लिविंग विथ एच. आय.व्ही. एड्स, विहान प्रकल्प, क्रांती महिला संघ, सोलापूर जिल्हा सामाजिक कार्य समिती मायग्रंट, ट्रकर्स प्रकल्प, सखी वन स्टॉप सेंटर प्रकल्प, सारथी युथ फाऊंडेशन, इनरव्हील क्लब ऑफ सोलापूर स्टारलेट, दमाणी ब्लड सेंटर, सोलापूर जिल्हा वृत्तपत्र लेखक मंच व सोलापूर कॅन्सर सोसायटी आदी महाविद्यालयांचे १५०० विद्यार्थी शिक्षक व सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी दिंडीमध्ये सहभागी होते. वालचंद महाविद्यालयाच्या प्रांगणातून दिंडीची सुरुवात होऊन पुढे सत्यम चौक, साईबाबा चौक , अशोक मार्केट रोड, व्यंकटेश देवस्थान, मितांशु हॉस्पिटल, गायत्री क्लिनिक, व्यंकटेश निवास, उमेश फोटो स्टुडिओ, बोल्ली मंगल कार्यालय, रंगदळ निवास, पंचमुखी हनुमान मंदिर मार्गे पुढे जाऊन सांगता वालचंद महाविद्यालयाच्या प्रांगणात झाली. दिंडीत विद्यार्थ्यांनी लोकसंख्या शिक्षण व छोटे कुटुंब यावरील घोषवाक्यांनी परिसर दणाणून सोडला.प्रारंभी स्वागत व प्रास्ताविक डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले. सूत्रसंचालन सुगतरत्न गायकवाड यांनी केले तर आभार प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांनी मानले

# पंढरीतील अतिक्रमण हटाव मोहीम थांबवा

## प्रशांतराव परिचारक यांची मुख्यमंत्र्यांना विनंती

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीःआषाढी यात्रेच्या नावाखाली पंढरपूर शहरातील अनेक दुकानदाराची लहान मोठी दुकाने अतिक्रमणात काढण्यात येत आहे येत असून त्यामुळे व्यापारी अक्षरशा उड्यावर आले आहेत आषाढी वारीवरच पंढरपूर शहरातील व्यवसायिक व नागरिकांची संसार चालत असल्याने अतिक्रमण कारवाई थांबवावी अशी मागणी माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे टून केली आहे पंढरपूर शहरात येणारे भाविक भक्त व वारकऱ्यांना इजा करण्यासाठी अडथळा येत असेल येथील अतिक्रमण काढावी परंतु पंढरपुरातील व्यावसायिक हे वर्षाने वर्ष एकाच ठिकाणी आहेत हे बाहेर गावाहून येणारे व्यवसाय रस्त्यावर बसतात व त्याचे अतिक्रमण न काढता स्थानिक व्यावसायिक यांचे अतिक्रमण काढले गेले व गरज असेल त्या ठिकाणी अतिक्रमण काढणे गरजेचे





असून सरसकट व्यापाऱ्यांना वेटीस धरुनये पंढरपुरातील अतिक्रमण काढण्याच्या मोहिमेत बाबत बाबत प्रशांतराव परिचारक यांनी मुंबई येथे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांना निवेदन दिले दिले आहे यामध्ये वर्षातील सर्वात मोठी आषाढी वारीचे नियोजन प्रशासनाकडून सुरू असून याचाच एक भाग म्हणून शहरातील प्रमुख रस्त्यावर अतिक्रमण काढण्यात येत आहे मागील चार दिवसापासून रस्त्याच्या बाजूला असणारी खोखी दुकानाची पानसरे पायऱ्या काढण्यात येत आहे त्यामुळे लहान लहान व्यवसाय करून कुटुंब चालवणाऱ्या व्यापाऱ्यांची हातावरची पोट असलेल्या नागरिकांची रोजी रोटी बंद पडली आहे कोणत्याही पूर्व सूचना न देता सदर कारवाई करण्यात येत असल्याने व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. वास्तविक पंढरपूरच्या अर्थव्यवस्था ही अजूनही वारीवरच चालणारी असून यामध्ये आषाढी ही सर्वात मोठी आर्थिक उडालदार होणारी वारी आहे यामुळे अतिक्रमण आटा मोहीम राबवताना व्यापारी कडे माणुसकीच्या दृष्टीने पहावी अशी विनंती परिचारक यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे

पंढरपूर शहरातील अतिक्रमण मोहीम स्थगित करून स्थानिकांना न्याय द्यावा अशी मागणी प्रशांतराव परिचारक यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे केली आहे

# श्री समर्थ विष्णुदास वारकरी कुस्ती महावीर स्पर्धा १५ जुलै रोजी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

| वयोगट | प्रथम क्रमांक | द्वितीय क्रमांक | तृतीय क्रमांक |
|---|---|---|---|
| १६ ते २५ वर्ष | रु. ४,०००/- | रु. ३,०००/- | रु.२,०००/- |
| २६ ते३५ वर्षे | रु. ५,०००/- | रु. ४,०००/- | रु.३,०००/- |
| ३६ ते ४५ वर्षे | रु. ६,०००/- | रु. ५,०००/- | रु.४,०००/- |
| ४६ ते ५५ वर्षे, | रु. ७,०००/- | रु. ६,०००/- | रु.५,०००/- |
| ५६ ते ६५ वर्षे | रु. ८,०००/- | रु. ६,०००/- | रु.५,०००/- |
| ७० वर्षाच्या पुढे | रु. ५,०००/- | रु. ३,०००/- | रु.२,०००/- |

पुणे : विश्र्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, श्री क्षेत्र आळंदी देहू पंढरपूर परिसर विकास समिती आणि महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दि १५ जुलै २०२४ रोजी दुपारी १.३० ते संध्याकाळी ५. वाजेपर्यंत श्री समर्थ विष्णुदास वारकरी कुस्ती महावीर स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा पंढरपूर, वाखरी येथील पालखी तळाच्या शेजारी विश्र्वशांती गुरुकुल परिसरात होणार आहे. वारकर्यांनी जास्तीत जास्त संख्येने या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे व्यवस्थापकीय विश्र्वस्त आणि कार्यकारी अध्यक्ष राहुल विश्र्वनाथ कराड व वारकरी कुस्ती महावीर स्पर्धेच्या संयोजन समितीचे सचिव विलास कथुरे यांनी केले आहे.

स्पर्धेचे उद्घाटन खासदार करवीर अधिपती श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल. तसेच उर्वरित महाराष्ट्र विकास महामंडळाचे माजी अध्यक्ष उल्हास पवार, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, हिंद केसरी दिनानाथ सिंग, आमदार समाधान आवताडे व महाराष्ट्र राज्याचे माजी आदिवासी विकास मंत्री बबनराव पाचपुते हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहतील.

अध्यक्षस्थानी श्री क्षेत्र आळंदी देहू पंढरपूर परिसर विकास समितीचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ. विश्र्वनाथ दा. कराड हे असतील.

आयोजित स्पर्धेत सहभागी होण्यासाठी वारकरी मल्लांनी १५ जुलै २०२४ रोजी सकाळी ७.३० वा. विश्र्वशांती गुरूकुलच्या मुख्य प्रवेश द्वाराजवळ आपली नावे नोंदणी करावी. सोबत वयाचा पुरावा म्हणून आपले आधार कार्ड किंवा शासनमान्य ओळखपत्र ठेवावे. अधिक माहितीसाठी डॉ.पी.जी.धनवे मो.नं.९८२२६२६० ०६ व श्री. विलास कथुरे मो. नं.९८५०२११४०४ यांच्याशी संपर्क साधावा. (प्रथम - सुवर्ण पदक, द्वितीय - रौप्य पदक, तृतीय - कांस्य पदक व रोख रक्कम)

विशेष आकर्षण म्हणजे योगमहर्षी वै. रामचंद्र गोपाळ शेलार उर्फ शेलारमामा यांच्या स्मृति प्रित्यर्थ तंदुरूस्त अशा सत्तर (७०) वर्षे वयाच्या पुढील मल्लांसाठी याच दिवशी आगळी वेगळी कुस्ती स्पर्धा होईल.

१६ ते २५ वयोगटातील विजेत्यास 'कुमार वारकरी कुस्ती महावीर' पुरस्कार, ५६ ते ६५ वयोगटातील विजेत्यास 'वारकरी कुस्ती महावीर' पुरस्कार आणि ७० वर्षांच्या पुढील विजेत्यास 'ज्येष्ठ वारकरी कुस्ती महावीर' पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल. विजेत्या कुस्ती महावीरांचा सन्मान - मानाचा फेटा, माऊलींची/जगद्गुरुंची प्रतिमा, शाल, स्मृतिचिन्ह, सुवर्ण/रौप्य/कांस्य पदक व रोख रकमेची बक्षिसे देऊन गौरव करण्यात येणार आहे.

महाराष्ट्रातील या लोककलेला परत संजीवनी मिळावी म्हणून याच दिवशी रात्री ८.०० ते ११.०० वाजेपर्यंत, वारकर्यांना अत्यंत प्रिय असलेल्या शांती ब्रह्म संत एकनाथ महाराजांचे प्रसिध्द असलेले नाथांचे भारूड व गवळणी ही स्पर्धा डॉ. संजय उपाध्ये व ह.भ.प. सुदाम महाराज पानेगावकर यांच्या उपस्थितीत घेण्यात येणार आहे.

# सोलापूर सूत व्यापारी संघाच्या अध्यक्षपदी सुनील संगा

## उपाध्यक्षपदी सुनील नावंदर, सचिवपदी गोवर्धन कोडम

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापूर सुत व्यापारी संघाच्या अध्यक्षपदी सुनील संगा, उपाध्यक्षपदी सुनील नावंदर तर सचिवपदी गोवर्धन कोडम यांची निवड करण्यात आली आहे.





सोलापूर सूत व्यापारी संघाची ९९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा साखर पेठ येथील कार्यालयात मावळते अध्यक्ष यल्लप्पा येलदी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या सभेत नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. अन्य पदाधिकारी पुढीलप्रमाणे आहेत. सहसचिव श्रीनिवास कमटम, खजिनदार जिनेन्द्र सुराणा, संचालक कौस्तुभ करवा, शशिकांत सिता, चेतन सुराणा, चंद्रशेखर बेत, प्रभाकर गोरंटी, विनायक राचर्ला, गोविंद बुरा, श्रीकांत तापडिया, अभिजीत चिल्लाळ, गोवर्धन बिल्ला, श्रीकांत येमूल.

विश्र्वस्तपदी बसवराज कुलकर्णी, यल्लप्पा येलदी, सुहास सोनी, तुळशीदास भुतडा, विष्णूपंत विन्नू यांची तर दलाल प्रतिनिधी म्हणून नागेश भंडारी यांची निवड करण्यात आली.

खेळीमेळीच्या वातावरणात झालेल्या या सभेत विविध विषयांवर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले.यामध्ये संघासाठी कायदेशीर सल्लागार नेमणे, जीएसटीअंतर्गत ४५ दिवसात पेमेंट करण्याच्या नियमात सुधारणा करण्यासाठी शासनदरबारी पाठपुरावा करणे, यंत्रमागधारकांकडून थकीत बिलाची वसुली करण्यासाठी अरबीट्रेशन ऍक्टअंतर्गत लवाद कमिटी नेमणे आदी निर्णयाचा समावेश आहे.

सोलापूर सूत व्यापारी संघात अनेक प्रकारचे सभासद असून यामध्ये १११आजीव सभासद, २५ वार्षिक सभासद तर ५० सूत एजंट सभासद आहेत.

# अक्कलकोट तालुक्यातील अवैध्य धंदे बंद करण्यात यावे : झळकी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**



अक्कलकोट/प्रतिनिधीः सोलपूर जिल्ह्यातील अक्कलकोट व हैद्रा या तीर्थक्षेत्रा सह तालुक्यातील दुधनी व ईतर ठिकाणी अवैध्य धंदे अगदी राजारोसपणे चालु असून याला आळा घालण्यात यावे.अशी मागणी रिपाइं(आठवले गट)चे जिल्हा उपाध्यक्ष श्री सैदप्पा झळकी यांनी सोलापूर ग्रामीण चे अप्पर पोलिस अधीक्षक प्रीतमकुमार यावलकर यांच्या कडे केली आहे. या विरोधात कितीही आवाज उठवले तरी आतापर्यंत पूर्णपणे बंद झालेली नाही. अक्कलकोट शहरासह दुधनी आणि दुधनी ग्रामीण,हैद्रा व ईतर ठिकाणी सुरु असलेल्या सर्व अवैध्य धंदे बंद करण्यासाठी अनेकदा विविध स्तरातून,पक्ष,संघटने सह सामान्य नागरिक व महिला मागणी करुन देखील हे का? बंद झाली नाही? म्हणून पोलिस व लोक प्रतिनिधिवर नाराज व्यक्त होत आहे.संपूर्णपणे बंद करण्याची मागणी असतांना देखील अवैध्य धंदेवाल्यांनी ते बंद न करता संबंधित पोलिस अधिकारी व अवैध्य धंदे वाल्यांच्या संगनमताने फक्त जागा बदलून लोकांना दिशाभूल करत आहे.अवैध्य धंदे का बंद होत नाही ? म्हणून नागरिकांत संभ्रम निर्माण होत आहे.यामुळे

तालुक्यात सद्या सर्वत्र मध्यपान,मटगा,जुगार(रम्मी व तिनपत्ते)खेळ,चोरीया सह कर्नाटकातील अक्रम मद्यविक्री सह इतर अवैध्य धंदे राज रोषपणे सुरु केली आहे.यामुळे पोलिस प्रशासनाच्या प्रतिमा मलीन झाली आहे.या अवैध्य धंदे असलेल्या परिसरातील नागरिकांना पोलिसा बद्दल विश्र्वासच राहिलेली नाही. कारण हे धंदे करणारी लोक समाजात वावरत म्हणतात की,अशा कितिही अर्ज करा धंद्यावर पोलिसांचे छाप पडत नाही साधा ताकीतही पोलिस देऊ शकत नाही आम्ही वरपखसून सगळ्यांचा कानावर ठेवली आणी हप्ता देतो

अक्कलकोट दुधनी व दुधनी ग्रामीण जवळील परिसरात राज रोषपणे अवैध्य धंदे सुरु असल्याने या भागातील लहान मुले व विध्यार्थी आहारी जाऊन बिघडवत आहे.मटका व जुगारात कर्जबाजारी झाल्यावर दारुच्या आहारी होवून कितीतरी संसार उध्वस्त होवून रस्त्यावर आली आहे. अनेक महिला विधवा झाली.काहिंच्या पत्नी सोडून गेली आहे. यामुळे समाजातील सुसंस्कारीत महिला वर्ग नाराजी व्यक्त करीत आहे. तरी आपण वरीष्ठ जातीने लक्ष घालून लवकरात लवकर बंद करण्यात यावे.अशी मागणी श्री सैदप्पा झळकी यांनी केली आहे. या निवेदनाचे प्रति, गृहमंत्री महाराष्ट्र राज्य मुंबई, मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य,मा.केंद्रीय मंत्री डां.रामदासजी आठवले भारत सरकार नई दिल्ली आणी प्रदेश अध्यक्ष तथा माजी राज्यमंत्री मा.राजाभाऊ सरवदे यांना दिल्याचे आमच्या प्रतिनिधित्व बोलतांना म्हणाले.

# गोष्टीच्या माध्यमातून मुलांच्या मेंदूचा विकास व संस्कार अशोक खानापुरे

**दैनिक यशसिध्दि न्यूज**



नळदुर्ग/प्रतिनीधी : नळदुर्ग ज्ञानदीप कलोपासक मंडळ नळदुर्ग संचलित धरित्री विद्यालय अलियाबाद येथे आज दिनांक१० जुलै २०२४ रोजी अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला जिल्हा समिती सोलापूर येथील पदाधिकारी यांनी श्यामची आई पुस्तकाच्या १० प्रति भेट दिल्या. या कार्यक्रमाचे अध्यक्ष साने गुरुजी कथामाला जिल्हा समिती चे अध्यक्ष अशोक खानापुरे, प्रमुख वक्ते उपाध्यक्ष प्रा.अशोक म्हमाणे,प्रमुख पाहुणे समर्थ जेष्ठ नागरिक संघाचे कार्याध्यक्ष शिवलिंगप्पा शहाबादे धरित्री विद्यालयाचे महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त मुख्याध्यापक सुनील पुजारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात *इतिहासाचे रंग रूप हे- या गीताने इयत्ता ९ वीतील विद्यार्थिनींनी केली. शाळेचे मुख्याध्यापक सुनील पुजारी यांनी सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यानंतर अशोक खानापुरे यांच्या हस्ते मुख्याध्यापक सुनील पुजारी यांना *श्यामची आई पुस्तकाच्या १० प्रती भेट देण्यात आल्या. अशोक म्हमाणे यांनी आपल्या मनोगतात ग्रंथतुला अशोक खानापुरे ७५ वा अमृतमहोत्सव मध्ये केलेल्या पुस्तकांचे प्रत्यक्ष शाळेत मोफत वाटप करत असलेल्या कार्याची माहिती सांगितली.कथेचे महत्व व त्यातून होणारे संस्कार किती महत्त्वाचे आहेत हे विद्यार्थ्यांना सांगितले.तसेच साने गुरुजी कथामालेकडून घेण्यात येणाऱ्या विविध परीक्षांची माहिती सांगितली. अशोक खानापुरे यांनी आपल्या मार्गदर्शनात श्यामची आई पुस्तकातील ४२ कथा,साने गुरुजींचे बालपण व आईचे संस्कार यातून साने गुरुजींच्या यशस्वी जीवनाचा आढावा घेतला. लेखक यदुनाथ थत्ते यांनी १०० वेळा श्यामची आई पुस्तक वाचल्याचे सांगितले व श्यामची आई चित्रपटातील साने गुरुजींची भूमिका पाठवणारे कलाकार माधव वजे यांची हत्तीवरून काढलेली मिरवणूक तसेच या चित्रपटाला मिळालेला राष्ट्रीय पुरस्कार याबद्दल माहिती सांगितली. गोष्टीच्या माध्यमातून मुलांच्या मेंदूचा विकास होतो व बालपणीच चांगले संस्कार त्यांच्या अंगवळणी पडतात असे सांगितले.*मीना नावाच्या छोट्याशा मुलीची गोष्ट सांगून तिच्या चाणाक्ष बुद्धीमुळे अट्टल चोर कसे पकडले गेले हे मुलांना सांगितले. शाळेचे मुख्याध्यापक सुनील पुजारी यांनी सर्व पदाधिकाऱ्यांच्या सामाजिक कार्याचा थोडक्यात आढावा घेतला. समाजामध्ये असे दिग्गज समाज सुधारक असताना समाज कधीच मागासलेला व अडाणी राहणार नाही अशी खात्री व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन होळे युवराज यांनी केले तर आभार सातलगावकर अण्णाप्पा यांनी मानले.